
शार्लट मराठी मंडळ
CHARLOTTE MARATHI MANDAL

शार्लट मराठी मंडळ प्रस्तुत

दीपतरंग २०२६



शुभ दीपावली

दिवाळी सण मोठा - आनंदाचा,
एकोप्याचा, आणि आपल्या संस्कृतीचा!

www.charlottemarathimandal.org

शार्लट मराठी मंडळ

दीपतरंग २०२६

नमस्कार मंडळी,

दीपांच्या सुवर्ण तेजात उजळली जीवनाची वाट,
आनंद,आपुलकी आणि उमेद यांचा चढला साज

ह्या साजिऱ्या क्षणांत मिसळला स्नेहाचा गंध,
घराघरांत झळकतो आज प्रेमाचा अनोखा आनंद.

ही दिवाळी, फक्त प्रकाशाची नाही,तर मैत्रीची आहे,आनंदोत्सवाची परिभाषा आहे
एकत्र येऊन मराठी संस्कृतीच्या तेजात न्हाऊन निघण्याची मेजवानी आहे

शार्लेट मराठी मंडळा तर्फे तुम्हा सर्वांना दिवाळीच्या अनेक शुभेच्छा

हा संदेश लिहित असताना आपला नोव्हेंबर 22, २०२६ चा दिवाळी सोहळाआनंदाने पार पाडवा म्हणून आम्ही सर्व मंडळाच्या सदस्यांनी आणि आपल्या दिवाळी टीमने खुप उत्सहाने तयारी केली आहे .
चिमुकल्यांचे फॅन्सी ड्रेस प्रदर्शन,मराठी शाळेचा कार्यक्रम ,छोट्यांचे कलागुण प्रदर्शन ,मोठ्यांचे कलागुण प्रदर्शन, स्वर संध्या हा आपल्याच शार्लेटच्या कलाकारांनी तयार केलेला सुमधुर गीतांचा कार्यक्रम असे अनेक कार्यक्रम आयोजित केले गेले आहेत. महत्वाचे म्हणूजे चहा, फराळ आणि जेवण सर्व तयारी जय्यत सुरु आहे ! आपण सर्व या मंगलमयी वातावरणात मंडळाची दिवाळी साजरी करूयात.

सद्य कार्यकारिणीची ही तिसरी दिवाळी आणि ह्या व इतर अनेक निमित्तानी परत परत आपल्या माणसांची सेवा करायची संधि मिळाली, व आनंद देण्याची म्हणून आम्ही सर्व आभारी आहोत.

बोर्ड म्हणून आम्ही January 2026 मध्ये मंडळाची सूत्रे हाती घेतली.,तेव्हा पासून अनेक उत्तम यशस्वी कार्यक्रम आपण सगळ्यांनी साजरे केले. वरिष्ठ नागरीकांसाठी उत्तररंग प्रोग्रॅम ,शाळेच्या मुलांकरता स्टीम प्रोग्रॅम आणि दिवाळी.

त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र येऊन २०२६ च्या दिवाळीचा आनंद ऐकमेकांच्या भेटीगाठी आणि चहा, फराळ जेवण करून साजरा करुया, हिच विनंती!

हे मंडळ आपले सर्वांचे आहे त्यामुळे आपण सर्व एकत्र येऊन ह्या दीपतरंगच्या रंगात रंगून जाऊयात ...!!!
आणि आनंदाने साजरा करूयात
"मैत्र जीव भावाचा सोहोळा मराठी अस्तित्वाचा "

जय महाराष्ट्र! जय शॉर्लेट !



Deepa Limaye
PRESIDENT



Sanket Kulkarni
VICE PRESIDENT



Manisha Naik
TRUSTEE



Sadashiv Godbole
TRUSTEE



Sagar Garule
TRUSTEE



Sameer Sawant
TREASURER

शार्लट मराठी मंडळ

दीपतरंग २०२६



दीपा लिमये

संपादकीय

नमस्कार शार्लेटकर मित्र मैत्रीणीनो,

आपणा सर्वांच्या घरची दिवाळी दिमाखात साजरी झाली असणार ह्याची खात्री आहे !!!

तेवढ्याच आनंदात आणि दिमाखात आता आपण आपल्या मंडळाची दिवाळी साजरी करायला जमत आहोत.

दिवाळी म्हणलं की आपल्या डोळ्या समोर येत ते सुंदर सजवलेलं घर आणि दारात काढलेली सुंदर रांगोळी, आकाश कंदील ,सुंदर पणत्या,खुसखुशीत फराळ आणि उत्तम दिवाळी अंक !

तर त्यातील बऱ्याच गोष्टींचा आनंद आपण घरी घेतलाच असणार, पण सामुहिक दिवाळी हा एक वेगळाच आनंद असतो.

मंडळाची दिवाळी हा एक उत्साहाचा सोहळा असतो,त्यात २०२३ पासून पासून आपण दीपतरंग " हा आपल्या मंडळाचा दिवाळी अंक, सुरु केला व त्यातून काही तरी वेगळं करण्याचे समाधान सगळ्यांना मिळाले .

आपणा सवांच्या उत्तम प्रतिसादामुळे यंदाही आपण दिवाळी अंक प्रकाशित करीत आहोत .यंदाची दिवाळी आपण दीपतरंग "आपली संस्कृती आपला अभिमान"ह्या संकल्पनेवर अंधारून साजरा करीत आहोत!

दिवाळी अंकात उत्तम कविता ,कलाकृती,लेख व गोष्टी आहेत, त्याचा नक्की आस्वाि घ्या !! वर्ष भरात साजरे केलेले काही आनंदाचे क्षण, आठवणी देखील ह्यात टिपले आहेत.

सर्व मंडळी ज्यांनी आपले लेख, कविता ,कलाकृती अंकासाठी देऊन सहभागी झालेत व सर्व प्रायोजक ज्यांनी जाहिरात देऊन हातभार लावला आहे हे त्या सर्वांचे आभार!

हा स्नेह असाच राहो ...!!!

आपणा सर्वांना दिवाळी व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!!!!!!

दिवाळी अंक कार्यकारिणी : मनिषा सरोदे , रिचा भिडे दीपा लिमये , सुभाष लिमये

CMM दिवाळी अंक 2026

शार्लट मराठी मंडळ

दीपतरंग २०२६

2026 Host Families

Ashvini & Sachin Dhavalikar

Reshma & Sagar Garule

Deepa & Subhash Limaye

Shilpa & Ashutosh Koparkar

Anushree & Sanket Kulkarni

Manisha & Pandurang Naik

Poornima & Dayanand Rawool

Chetna & Abhijit Shende

Mangala & Yadneshwar Vadodkar



शार्लट मराठी मंडळ

CHARLOTTE MARATHI MANDAL

शार्लट मराठी मंडळ प्रस्तुत

दीपतरंग

२०२६

Poems

वसुंधरा

कोणे एकेकाळी जी
होती मानव स्पर्शा रहिता
शुद्ध निर्मला भास्कर दुहिता
त्या भूमीवर न्या मज देवा

राज्य होते जीवर मृत्तीकेचे
पक्षांच्या मधुर कलरवाचे
अन् फुलपंखींच्या इंद्रधनुष्याचे
त्या भूमीवर न्या मज देवा

सागरांतील मत्स्यांचे
हिरव्या कंच वृक्षवेलींचे
सुंदर पोपटी तृणांकुरांचे
त्या भूमीवर न्या मज देवा

जेव्हां नव्हती ती रणभूमी
नव्हती आक्रमणे परक्यांची
नव्हती स्फोटके नव्हत्या संगीनी
त्या भूमीवर न्या मज देवा

नव्हती उध्वस्त वने उपवने
नद्यानाले आणी कुरणे
नव्हती विदीर्ण दु:खी धरा
त्या भूमीवर न्या मज देवा

जेव्हां होईल मानव शहाणा
त्यजेल त्याचा मीपणा
सोडेल जेव्हां अंगीच्या दुर्गुणा
त्या भूमीवर न्या मज देवा

एकजुटीने रहा मानवा
होईल तेव्हां अपुली वसुंधरा
प्रकाशमया समृद्धा अन् सुंदरा
त्या भूमीवर न्या मज देवा ।

--- अनुराधा मेढेकर

पानगळ

सृष्टी मध्ये वसंत सरला
येतां बघुनी शिशिराला
सुप्रभाती अशाच एका
वदला वारा तरूपर्णांना

माझ्यावरती होऊन स्वार
झूलता हवेंत गारगार
उतरा आता धरेवरी
संगे खेळू आपण सारी

ठेवा काढून हिरव्या वस्त्रा
या लेवून साज सोनपिवळा
वसंत सरला जाणा आता
येत आहे शिशिर हिवाळा

वाऱ्याची ती साद ऐकुनी
गात हासत आल्या पर्णिका
हिरव्या कुरणी वाऱ्यासंगे
नाचत थिरकत यथेच्छ फिरल्या

तरूवर स्थित रातकिड्यांना
करून दंडवत अखेरचा
म्हणती आठव येईल तुम्हां
सकला अमुचा पर्णांचा

वसंतात येईल चैत्रपालवी
स्वागत करावे त्यांचे तुम्ही
निरोप आता जातो घेऊनी
वृक्षमाय माऊलीचा आम्ही

□ोटी पाने निवांत निजली
शेजेवर धुलिकेच्या
धरणी माता प्रेमे घेई
कुशींत हो त्यांना

सृष्टीतूनी रे मनुजा
जाणून घे जीवनाचे मर्म
शेवटचा दिनु असावा गोड
मनी बांध रे खुणगांठ ।

---अनुराधा मेढेकर

एखादा दिवस असाही उजाडावा
एखादा दिवस असाही उजाडावा
फक्त तुझा श्वास जवळ असावा
विसरून जावी चढाओढ जीवनाची
येणारा एक एक क्षण कधी न संपवा

वाटावं का रुक्ष तुझ्या नसण्याने
आणि रंग भारतात स्वप्नात तुझ्या असण्याने
शब्दांना अर्थ येतो तुझ्या ओठातून
ओघळताना
स्पर्श हवासा वाटतो आठवणी उलगडताना

पार केली किती युद्ध सहज दोघांनी
जितक्या परीक्षा तेवढा बंध घट्ट झाला
विचारांच्या चक्रव्यूहात जेव्हा वाहून जातो
तेव्हा असा वाटतं ..
एखादा दिवस असाही उजाडावा
फक्त तुझा श्वास जवळ असावा.

कवी - अभिजीत एकरे

जेव्हा मी नसेल तेव्हा
कधी डोळे जर पाणावले तर
तुझ्या अश्रूंना स्वतः पुसून टाकशील.
दुसऱ्याने कुणी बघितले तर
ते त्याचा हिशोब करतील.

भावनांवर स्वार होऊन तुझ्या
नाजूक मनाचा कोपरा शोधतील.
किंमत तर कधीच कळणार नाही त्यांना
पण मोजण्याचा प्रयत्न नक्कीच करतील.

कवी - अभिजीत एकरे

दीपावली चा सण

लाडू, आनरसा, चिवडा, चकली
शेव,करंजी, शंकरपाळी
सगळ्या फराळाचा खमंग सुवास, घेऊन आली दीपावली

दिव्यांची रोषणाई, दिवाळी पहाट, दारात रांगोळी
उत्साही वातावरण, घेऊन आली दीपावली

अभ्यंगस्नान, नवीन कपडे, साज शृंगार
भेटीगाठीची ओढ, घेऊन आली दीपावली
फटाक्यांची मौज, किल्ला स्पर्धा
फुलबाजी स्फूर्तीची, घेऊन आली दीपावली
सुख,समृद्धी, आनंदाचे क्षण
तुमच्या आमच्या जीवनात नवीन रोषणाई घेऊन आली दीपावली !!

--मनिषा सरोदे

संवाद

संवाद जुळवून आणतो दोन मनांमध्ये सुंदर नातं
संवादच नसेल तर जीवनात उरतो फक्त एकांत

मान्य आहे कि संवादातला संयम गेला कि उरतो फक्त वाद
पण वाद, संवादाने मिळते मनातल्या भावनांना नवीन वाट

बदलत्या काळात फोन, फेसबुक, Instagram नेच होतो संवाद
whatsapp ने तर मांडला आहे नुसता उच्छाद

सणवार, वाढदिवसाच्या शुभेच्छा प्रत्यक्ष द्यायला नाही वेळ
म्हणुन whatsapp वर सुरू झाले emoji पाठवण्याचा नवीन खेळ

आमंत्रणंसाठी सुद्धा पत्र, पत्रिकेचा झाला आता सूर्यास्त
Email, whatsapp ने केले सगळीच ही कामे स्वस्त

भावनांची झाली आहे खरी तारांबळ
कुठल्या platform वर कसे, कधी व्यक्त होयचे ह्याचीच नुसती तळमळ

अविचार, गैरसमजांची रोज वाढते वृक्षवेल
मतभेदांना दूर करायला कोणाकडे नाही पुरेसा वेळ

संवेदना आणि संवाद होत आहे धूसर
एकमेकांच्या आयुष्यात डोकवायलाही मिळत नाही अवसर

निखळ संवाद साधायला करावी लागते कोणीतरी सुरवात
तेव्हाच जडते शब्दांच्या पलीकडील नात्यांची रेशीमगाठ

इथेच पूर्ण झाला आज हा अनोखा "संवाद"
आता फक्त आस आहे, लाभू द्या तुमची खरी "दाद".

---मनिषा सरोदे

दोन किनाऱ्यांचे मन!
एका किनाऱ्यावर आई-बाबा,
बालपण आणि जुन्या खुणा,
दुसऱ्या किनाऱ्यावर
स्वप्नांची वाट,
आणि नव्या नात्यांचा उबदार खुणा.

अंतर वाढल की ओढ वाढते
आठवणींना पालवी फुटते,
परक्या देशात नकळत पुन्हा,
आपुलकी ची वाट खुलते.

आज दोन देशांत घर आहे,
दोन किनाऱ्यांत जीव अडकला,
मुळं भारतातच राहिली,
आणि अमेरिकेत प्रेमाचा वृक्ष बहरला.

--गीता सावंत

निरोप
निरोप घेता घेता
दोन शब्द बोलावेसे वाटतात
ते दोन शब्द ओठी येताच
अश्रु गाळावे लागतात
अश्रु गाळावे लागतात ....

वर्षभराच्या आठवणी क्षणभरातच येतात
क्षणभरातच अश्रुत मिसळून जातात


हा क्षण सांगुन जातो
आपल्या अस्तित्वाची महती
हाच तर पुरावा असतो
आयुष्यभर आपुल्या संगती

निरोप घेता घेता
दोन शब्द बोलावेसे वाटतात
ते दोन शब्द ओठी येताच
अश्रु गाळावे लागतात
अश्रु गाळावे लागतात ....

--रोहिणी शिरसकर

होवु दे शब्दरूप
रंगांची उधळण
उठू दे मनी आठवणी
चे रंग तरंग
रंगु दे काव्यरूप
प्रेमाचा सप्तरंग

- रोहिणी



SILVER SPONSOR

PROCYON



Meet Your Advisor

Prasad Sanket Oak, CFP®

Vice President
Private Wealth Advisor

About Sanket:

With nearly 20 years in the industry, Sanket works closely with clients in the Charlotte Marathi community to develop customized strategies aligned their goals. He focuses on multigenerational families, executives, and medical professionals, helping them navigate complex financial decisions with clarity and confidence.

(860)-854-3889
oak@procyon.net
www.procyon.net

LET'S TALK ABOUT YOUR FINANCIAL FUTURE

Charlotte Marathi Mandal's trusted source for your investment, retirement, estate, and tax planning needs.

INVESTMENT MANAGEMENT
Portfolios built around your goals and your comfort.

RETIREMENT PLANNING
Income strategies that support the retirement you want.

ESTATE PLANNING
Plans that protect your family and carry on your legacy.

TAX PLANNING
Strategies to help you keep more of what you earn.

Book Your Complimentary Consultation Today

A no-obligation conversation about where you are today and where you want to be.

CLICK / SCAN TO BOOK

Investment advisory services are provided through Procyon Advisors, LLC. Procyon Advisors, LLC is a registered investment advisor with the U.S. Securities and Exchange Commission ("SEC") and does not provide tax or legal advice. This flyer is provided for informational purposes only and is not intended as an offer, or a solicitation of an offer, to buy or sell any investment or specific product. This report is also available for distribution only to the intended recipient(s) only.



शार्लट मराठी मंडळ

CHARLOTTE MARATHI MANDAL

शार्लट मराठी मंडळ प्रस्तुत

दोपतरंग

२०२६

Stories

पर्णोत्सव

फिनिक्स, ॲरिझोनाहून शार्लट, नॉर्थ कॅरोलायनाला स्थलांतर केलं आणि एका वेगळ्याच दुनियेत प्रवेश झाला. धूलिकणांच्या देशातून झाडापानांच्या देशात!

ॲरिझोना म्हणजे रखरखीत उन्हाळा, तपकिरी डोंगर, वाळवंट, निवडुंग आणि धूळ. उन्हाळ्यात कधीकधी येणारी प्रचंड धुळीची वादळं, म्हणजे हबूब. ही वादळं काचेआडून पाहण्यासारखी असतात. क्षितिजावर धुळीची एक भिंत उभी राहते आणि बघता बघता संपूर्ण शहराला गिळंकृत करते. तेही निसर्गाचं एक रौद्र, भव्य रूपच!

तिथे झाडं नाहीत असं नाही. आहेत, पण बरीचशी सूचीपर्णी, काटेरी, छोट्या पानांची, पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरणारी. निसर्गनिच त्यांना काटकसरीचं शिक्षण दिलेलं. पण माझ्यासारख्या उष्णकटिबंधीय प्रदेशात वाढलेल्या व्यक्तीला पानं कशी हवीत? हाताच्या तळव्यासारखी, मऊ-मुलायम, वाऱ्यावर डोलणारी, उन्हात सावली देणारी, पावसात निथळणारी. पान म्हणजे नुसतं प्रकाश संश्लेषण (photosynthesis) करणारं यंत्र नव्हे, त्याला एक व्यक्तिमत्त्व असावं, असा माझा काहीसा बाळबोध हट्ट!

फिनिक्समध्ये उच्चभ्रू वस्त्यांच्या रस्त्यांवर, आलिशान मॉल्सच्या परिसरात, पामची झाडं रांगेने उभी असतात. छान दिसतात, पण मी त्यांना दृश्य वृक्ष (virtual) म्हणते. म्हणजे काय, तर झाड असल्याचा संदेश आपल्या मेंदूपर्यंत पोहोचवण्याचं काम ती चोख करतात. पण त्यांच्या सावलीत दोन घटका बसावं म्हटलं तर पंचाईत! त्यांना बघून कबीरांचा दोहा आठवतो.

बड़ा हुआ तो क्या हुआ, जैसे पेड़ खजूर।
पंथी को छाया नहीं, फल लागे अति दूर॥

अर्थात, फिनिक्सवर माझं नितांत प्रेम आहे. तिथलं विस्तीर्ण आकाश, अफाट क्षितिज, सुंदर सूर्यास्त, हिवाळ्यातलं आल्हाददायक हवामान-- वाळवंटाचं स्वतःचं एक सौंदर्य आहे, आणि तिथल्या लोकांचं कौतुक करावं तेवढं थोडंच. प्रतिकूल परिस्थितीतही झाडं लावण्याची, जगवण्याची त्यांची धडपड सतत सुरू असते. पण त्यासाठी कृत्रिम सिंचनाची मदत घ्यावी लागते. निसर्गाच्या मर्यादा मान्य करूनच तिथे हिरवाई निर्माण करावी लागते.

अशा फिनिक्समधून आम्ही शार्लटला आलो.

आणि पहिली प्रतिक्रिया?

डोळे निवले!

जिकडे पाहावं तिकडे हिरवाई, उंचच उंच झाडं. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी, घरांच्या आजूबाजूला, डोंगरउतारांवर, मोकळ्या जागांवर, झाडं, झाडं आणि झाडंच!

डोळे निवले आणि मन हलकं हलकं झालं. मग ते उडालं, झाडांच्या फांद्यांवर जाऊन बसलं, शेंड्यावर नाचलं, एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारू लागलं, चक्क बागडलं!

काय सांगू, इतकी झाडं एकदम पाहून मनातल्या लहान मुलीला जणू कुणीतरी खेळायला मोकळं रान दिलं होतं.

आणि मग सुरू झाला ऋतूंचा खेळ!

वसंतऋतूत झाडांच्या अंगाखांद्यावर इवली इवली कोवळी पानं दिसू लागतात, पोपटी, हिरवी, पिवळसर, कधी लालसर छटा असलेली. काही झाडं आधी फुलतात, मग पानांनी बहरतात. या नव्या पालवीच्या आश्रयाला रंगीबेरंगी पक्ष्यांची लगबग सुरू होते. कुणी घरटं बांधतंय, कुणी जोडीदाराला साद घालतंय, कुणी पिल्लांसाठी अन्न शोधतंय. चिवचिवाट, किलबिलाट, फांद्यांवरची धावपळ. जणू नव्या वर्षाच्या स्वागताची गडबड सुरू होते.

उन्हाळा आला की हीच कोवळी पालवी गडद हिरव्या रंगाची होते. झाडं भरदार होतात. फांद्याफांद्यांतून पानांचे थर तयार होतात. सूर्यकिरणांना जमिनीपर्यंत पोहोचण्यासाठी त्यातून वाट काढावी लागते. खाली मात्र गार सावली पसरलेली असते. गाडीतून कामावर जातायेता या झाडांकडे पाहताना मी नेहेमी झाडांसाठी कुठचं गाणं म्हणावं असा मला प्रश्न पडतो. कारण झाडांचं योग्य वर्णन आणि कौतुक करणारं एकही मनासारखं हिंदी किंवा मराठी गाणं मला अजून तरी सापडलं नाहीये. मला नेहमी वाटतं, यांच्यावर एखादं छानसं गाणं असायला हवं. फुलांवर गाणी आहेत, पावसावर आहेत, चंद्र-चांदण्यांवर तर असंख्य आहेत! झाडंही गाण्यांत असतात, नाही असं नाही, पण बहुतेकदा नायक-नायिकांना आडोसा द्यायला किंवा त्यांच्या प्रेमप्रकरणाला साक्षी राहायला. स्वतः झाडाचंच कौतुक करणारं गाणं मात्र माझ्या ऐकण्यात नाही. एवढ्या वर्षांपासून सावली देत उभ्या असलेल्या झाडांच्या, पानांच्या वाट्याला एखादं गाणंही येऊ नये? हा जरा अन्यायच नाही का?

वारा सुटला की झाडं हलके हलके डोलायला लागतात. पानांची सळसळ सुरू होते.

समुद्रकिनारी बसल्यावर लाटांची जी गाज ऐकू येते ना, तशीच काहीशी गाज इथे झाडांमधून ऐकू येते. फरक इतकाच की समुद्राची गाज लाटांच्या येण्याजाण्याची असते, तर झाडांची गाज हजारो पानांच्या एकत्रित हालचालींची. सतत जिवंत, सळसळती, बदलती. पण तरीही त्या आवाजात एक विलक्षण शांतता असते.

किती विरोधाभास आहे ना? सतत हालचाल करणारी पानं आणि वर्षानुवर्षं एका जागी स्थिर उभी असलेली झाडं, जिवंत, सळसळती, पण तरीही शांत, स्थितप्रज्ञ, भोवतालच्या जगाची भक्कम साक्षीदार.

रस्त्याच्या दुतर्फा उभी असलेली ही उंच झाडं मला कधीकधी भालदार-चोपदारांच्या फौजांसारखी वाटतात. पण या फौजा आक्रमक नाहीत, संरक्षक आहेत. रस्त्यावरून जाणाऱ्यांना सावली देतात, पक्ष्यांना आश्रय देतात, आणि वाऱ्याच्या झुळुकीबरोबर येणाऱ्या-जाणाऱ्यांना जणू सलाम करतात.

या झाडांकडे पाहताना एक प्रश्न मात्र माझ्या मनात अनेकदा येतो.

एवढा पानसंभार अंगावर घेऊन ही झाडं तासन्तास, दिवसेन्दिवस उभी असतात. काय विचार करत असतील?

विचार करत तरी असतील का मुळी?

कदाचित करतही असतील. त्यांची भाषा आपल्याला अवगत नाही, म्हणून आपल्याला कळत नसावं.

आफ्रिकेतल्या बाभळीच्या-सम झाडांवर झालेल्या संशोधनाविषयी वाचलं होतं. जिराफासारखे प्राणी कोवळी पानं खाऊ लागले की काही झाडं स्वतःच्या संरक्षणासाठी पानांमधील रासायनिक घटक बदलतात. काही वनस्पती हवेत विशिष्ट रसायनंही सोडतात, जणू इतर झाडांना निरोप धाडतात, ज्यांचा परिणाम शेजारच्या झाडांवर होतोही, पानांमधील टॅनिनसारखे पदार्थ वाढतात आणि प्राण्यांना ती पानं पचवणं कठीण होऊ शकतं.

म्हणजे झाडं संकटाला प्रतिसाद देतात. आणि काही वेळा शेजाऱ्यांनाही त्याची सूचना देतात!

झाडांच्या मुळांशी जोडलेल्या बुरशीच्या जाळ्यांविषयीही संशोधन सुरू आहे. या जाळ्यांमधून पोषक घटकांची देवाणघेवाण आणि कदाचित काही संदेशवहनही होत असावं, अशी शक्यता अभ्यासली जाते आहे. त्याबद्दल अजून बरेच प्रश्न अनुत्तरित आहेत.

पण विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आपण बोलतो, ऐकतो, संदेश पाठवतो. झाडंही आपल्या परीने पर्यावरणाशी संवाद साधत असतात. आपल्याला फक्त त्यांची भाषा समजत नाही.

आणि मग उन्हाळा संपत येतो.

हवेतील उष्णता कमी होऊ लागते, दिवस लहान होतात, सूर्यप्रकाशाचा रोख बदलतो, आणि एक दिवस अचानक लक्षात येतं की कालपर्यंत हिरवंगार असलेलं झाड आज काहीसं पिवळं दिसतंय.

मग दुसऱ्या झाडावर केशरी रंग चढतो, तिसरं लाल होतं, चौथं सोनेरी. काही झाडं गडद जांभळट, तर काही तांबूस तपकिरी रंगात न्हाऊन निघतात.

आणि बघता बघता सगळ्या परिसराचा कायापालट होतो!

मला या दिवसांत झाडं पाहताना नाटकाच्या प्रयोगाची आठवण येते. प्रयोग सुरू होण्यापूर्वी प्रत्येक पात्र आपापली रंगरंगोटी करतं. कुणी भडक रंगाचा पोशाख चढवतं, कुणी भरजरी शेला पांघरतं, कुणी चमकदार दागिने घालतं, आणि मग एकामागून एक पात्रं रंगमंचावर अवतरतात.

तसंच काहीसं इथल्या झाडांचं होतं.

प्रत्येक झाडाची रंगभूषा वेगळी. प्रत्येकाचा पोशाख वेगळा. कुणी लालभडक, कुणी पिवळंधमक, कुणी केशरी, तर कुणी सोनेरी. आणि गंमत म्हणजे एकाच झाडावर अनेक रंगांची पानं असतात, जणू कुणीतरी रंगपेटी उघडून मुक्तहस्ताने रंगांची उधळण करतं.

पर्णोत्सवात रंगोत्सव सामील होतो!

कुणीतरी या दृश्याला 'सृष्टीदेवीचं हळदीकुंकू' म्हटलं होतं. किती समर्पक कल्पना!

पण हा रंगोत्सव एका वेगळ्याच कारणासाठी असतो. पानांच्या आयुष्याची अखेर जवळ आलेली असते. दिवस लहान झाल्यामुळे आणि तापमान कमी झाल्यामुळे पानांमधलं हरितद्रव्य कमी होऊ लागतं. आतापर्यंत हिरव्या

रंगाआड दडलेले पिवळे, केशरी रंग दिसू लागतात. काही पानांत लाल रंगद्रव्यं तयार होतात, आणि मग ही पानं आपल्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर निरनिराळ्या रंगांनी उजळून निघतात.

किती विलक्षण आहे ना हे!

आपल्याकडे उतारवय म्हणजे हळूहळू मागे सरकण्याचा, रंग फिके होण्याचा काळ मानला जातो. पण ही पानं वेगळंच काही सांगतात. आयुष्याची संध्याकाळ आली म्हणून रंग सुटायला नकोत. उलट आतापर्यंत जे रंग जपले, जे अनुभव साठवले, जे काही कमावलं, ते सगळं भरभरून उधळायचं, आपापल्या रंगात उजळून निघायचं, मग तो रंग कुठलाही असो, लाल, पिवळा, केशरी, सोनेरी किंवा तपकिरी.

प्रत्येक रंगाचा उत्सव साजरा व्हायला हवा.

आणि मग सुरू होते पानगळ.

कालपर्यंत झाडाला घट्ट धरून बसलेली पानं आता एकेक करून निरोप घेऊ लागतात. आणि निरोप तो कसा? ना रडारड, ना शोकसभा. वाऱ्याच्या झुळुकीवर स्वार होऊन पानं हवेत गिरक्या घेतात. कधी तरंगतात, कधी झेपावतात, कधी एखाद्या अदृश्य संगीताच्या तालावर नाचतात, आणि अलगद जमिनीवर उतरतात.

असं वाटतं जणू झाडं आशिर्वादांची संथ वृष्टी करताहेत!

खाली रंगीबेरंगी पानांचा गालिचा अंथरला जातो. लाल, पिवळ्या, केशरी पानांच्या राशी साचतात. लहान मुलं त्यात उड्या मारतात, लोळतात, पानं हवेत उधळतात. मोठी माणसं लाजेखातर तसं करत नाहीत. पण मुद्दाम पानांच्या ढिगातून चालताना त्यांच्या पायाखाली होणारी कुरकुर ऐकून त्यांनाही मजा येते, हे मात्र नक्की!

पानगळ पाहताना मला आणखी एक गोष्ट जाणवते.

फूल गळून मातीत मिसळलं की मातीला सुगंध देतं, अशी कविकल्पना आपण ऐकून आहोत. पण पान पण मातीशी एकरूप झालं की एक फार महत्वाचं काम करतं. हळूहळू त्याचं विघटन होतं, त्यातले पोषक घटक पुन्हा मातीत मिसळतात आणि मातीचा कस वाढवतात. ज्या झाडाच्या अंगाखांद्यावर ही पानं जन्मली, वाढली, हसली, नाचली, सळसळली, त्याच झाडाच्या वाढीसाठी ती हातभार लावतात. म्हणजे पानांचं आयुष्य संपतं, पण त्यांचं देणं संपत नाही.

निसर्गात टाकाऊ असं काहीच नसतं, याची किती सुंदर प्रचिती!

पानगळ संपते आणि झाडांचे खराटे होतात. काही दिवसांपूर्वी रंगीबेरंगी पोशाखात मिरवणारी झाडं आता निष्पर्ण, उघडी-बोडकी उभी असतात. फांद्याफांद्यांचं जाळं स्पष्ट दिसू लागतं. उन्हाळ्यात पानांच्या गर्दीत लपलेला झाडाचा मूळ आकार आता नजरेस पडतो. थंडी सोसायची तयारी सुरू झालेली असते.

झाडं जणू दीर्घ विश्रांतीची तयारी करतात. त्यांची वाढ मंदावते. ऊर्जेचा वापर कमी होतो. पानं गाळून त्यांनी पाण्याची बचत आधीच केलेली असते. जीवनावश्यक प्रक्रिया मात्र आतून सुरूच असतात., वरवर शांतता, आतून पुढच्या ऋतूची तयारी.

कधीतरी बर्फ पडला तर निसर्गाचं आणखी एक रूप दिसतं. काळ्या फांद्यांवर पांढऱ्या बर्फाची नक्षी उमटते. जणू कुणीतरी चारकोलने काढलेल्या चित्रावर पांढऱ्या रंगाचे हलके फटकारे फरांटे ओढतं. रंगोत्सव संपून आता कृष्णधवल चित्रांचं प्रदर्शन भरतं.

सूर्य आला तर येवो, गार वारे वाहिले तर वाहोत बापडे, झाडं मात्र निर्विकार उभी असतात.

त्यांनी आपली पानं गाळलेली असतात, पण पुढच्या पालवीची शक्यता भावी कळ्यांमध्ये जपून ठेवलेली असते. मुळं जमिनीत घट्ट रोवलेली असतात. थंडीच्या दिवसांतही ती आपलं अस्तित्व टिकवून ठेवतात.

कधीकधी वाटतं, स्थितप्रज्ञतेचा अर्थ समजून घ्यायचा असेल तर हिवाळ्यातल्या निष्पर्ण झाडांकडे पाहावं.

ना गेलेल्या पानांचं दुःख, ना येणाऱ्या पानांची नवलाई., जे आहे त्याचा शांत स्वीकार.

बघता बघता हिवाळा निघून जातो.

आणि मग एक दिवस...हो, अगदी एक दिवस अचानक, कालपर्यंत निष्पर्ण असलेल्या झाडाच्या फांदीवर दोन इवलीशी पानं दिसतात. काही महिन्यांच्या शांततेनंतर झाडं पुन्हा जागी होतात.

पर्णोत्सव कधी संपतच नाही. फक्त त्याचे रंग बदलत राहतात.

फिनिक्समध्ये असताना मला वाळवंटात प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहण्याची जिद्द दिसली.
तर शार्लटमधल्या झाडांमधे बदलाला सामोरं जाण्याची, भरभरून जगण्याची आणि योग्य वेळी सहजपणे सोडून देण्याची कला जाणवली.

दोन्ही निसर्गाचीच रूपं, दोन्हींची शिकवण वेगळी.

पण इथल्या पानांनी मला एक गोष्ट मात्र नव्याने शिकवली.

आयुष्याच्या प्रत्येक ऋतूला स्वतःचा एक रंग असतो. आणि प्रत्येक रंगाचा उत्सव साजरा करता येतो.

म्हणूनच हा पर्णोत्सव!

पानांचा उत्सव. रंगांचा उत्सव. बदलाचा उत्सव.

-रोहिणी अभ्यंकर
rohini.abhyankar@gmail.com

दिवाळी शुभेच्छा

'दिवाळी'-सळसळणारी उमेद चमकणाऱ्या दिव्यातून चाहूल देते.

रंगकीराणांच्या पायघड्यांवरून आनंद उधळीत दिवाळी येते.

सुखाची व्हावी वृद्धी, सर्वाना लाभो कीर्ती बुद्धी.

अंतरी सुखाचा सागर उसळू दे. दीपावलीच्या मंगल दीपामध्ये प्रेमाची ज्योत उजळू दे.

प्रगतीची उपासना, मंगल्याची आराधना, सर्वांच्या सुखाची प्रार्थना, प्रयत्न करणाऱ्यांना प्रेरणा.

या माझ्या आनंद गीतातून सर्वाना दिवाळीच्या शुभ कामना.

आली दिवाळी आली दिवाळी, ओंजळीत घ्या चार दिवे

पहिला लावा थेट मनातच तरीही राहील दुसरा तेवत प्रिय

जणांवर उजेड बरसत,आयुष्याला येईल रंगत

तिसरा ठेवा आपुल्याच अंगणी, उजेड आल्यागेल्यांनाही

चौथा ठेवा अशा ठिकाणी जिथे दिवाळी माहित नाही.

चला सर्वाना घेऊन दिवाळी साजरी करू.

'शुभ दीपावली'

निर्मला सरोदे

रंजक दिवाळी अनुभव

या वर्षी माझी दिवाळी नातवंडांन बरोबर शार्लट, नॉर्थ कॅरोलिना मध्ये अतिशय आनंदमय साजरी झाली. मंडळी, शार्लट मध्ये 'प्रेस कॉट हिल' एरिया मध्ये खूप उत्सहात दिवाळी साजरी होते. मैत्रिणी एकमेकांना फराळ करण्यासाठी मदत करतात.खूप लांबून लांबून येतात, त्यांचं प्रेमच त्यांना खेचून आणत. नक्षत्रा सारखी 'रोहिणी' नक्षत्रा सारखं लोभस रूप घेऊन आली, आणि चांदणीची रंगीत करंजी केली. गीताई घेऊन 'गीता' आली, आणि तिने खमंग चकली केली. सर्वांना नावासारखी प्रिय असलेली 'प्रियांका'आली, गोल गोल गोड गोड लाडू वळू लागली. मिश्किल हसणारी 'आभा' आली, आणि तिखट गोड शंकरपाळी करु लागली. सुगरण असलेल्या 'मनीषाने' चटपटीत चिवडा केला आणि बघता बघता फराळ तयार तयार झाला 'नयना' आली आणि आश्चर्याने डोळे मोठे करून बघू लागली, अरेवा,फराळ तर मी येण्याच्या आधीच तयार झाला. अहो, त्या फराळाची काय लज्जत सांगू, फराळाची कम्माल आणि,फटाक्यांचीनुसती धम्माल. सगळे मिळून फटाके उडवतात, दिव्यांची रोशनाई करतात, सुंदरशी रांगोळी काढतात. सगळं कस अगदी पूर्वी सारखं हं. फराळ खायला सगळेच असतात. मैत्रीणी, पुरुष मंडळी, आणि सगळ्यांची बाल गोपाल मंडळीहि. त्यामुळे हे संस्कार आपोआपच पुढच्या पिढीला दिले जातात.सगळेजण गाणी म्हणतात, गप्पा गोष्टी, जुन्या नव्या आठवणीना पूर येतो. म्हणूनच मला म्हणावंसं वाटत, दिवाळीचा दिवा तेला तुपात लावू प्रीतीच्या ज्योतीला स्नेहाने ओलवू, दिवाळीचा दिवा तेला तुपात लावू. प्रीती, ज्योती आणि स्नेहा याही तिघी जिवलग मैत्रिणी आहेत, आणि त्यांच्या सोबत आनंदही असतो हं. म्हणूनच दिवाळीचा आनंद ओसंडून वहतो.

निर्मला सरोदे

Pandurang and Manisha Naik



BRONZE SPONSOR









BRONZE SPONSOR





शार्लट मराठी मंडळ

CHARLOTTE MARATHI MANDAL


शार्लट मराठी मंडळ प्रस्तुत


दोपतरंग

२०२६

Artworks


Arnav Shiraskar - Tiger Sketch





Art by Arnav Shiraskar – Lake View Sketch

Arohi Shiraskar



Llusion "Created in three phases, two years apart. I started with myself, drowned in the illusion of freedom, and ended up just filling the void."

Arohi Shiraskar



"How I'd style myself if... I could"



"kaafi cool, so keep kam se काम!! "

Saanvi Sawant



Artwork Title: A Zesty Splash of Green – The Beauty of Lime

This vibrant pencil painting captures the freshness and beauty of a juicy green lime. The artist uses different shades of green, white highlights, and dark outlines to create depth, texture, and a refreshing appearance. The detailed lime slice at the centre adds a lively touch, while the surrounding green design makes the artwork visually striking.

Geeta Sawant



Fall colours painting

This painting beautifully captures a special chapter of our lives — the joy of growing together and rediscovering each other. As children grow up and begin their own journeys, a new season unfolds for us. Just like the golden autumn leaves, life changes its colours, bringing a different kind of beauty. The two of us walk hand in hand through a peaceful autumn park, surrounded by falling leaves, colourful trees, and the warmth of togetherness. After years of parenting, responsibilities, and putting our children first, we finally have more time for ourselves — to slow down, enjoy little moments, take long walks, travel, talk, laugh, and create beautiful memories together.
The painting reminds us that life doesn't become less beautiful when children grow up; it simply opens the door to a beautiful new beginning.

Richa



शार्लट मराठी मंडळ

CHARLOTTE MARATHI MANDAL

शार्लट मराठी मंडळ प्रस्तुत

दोपतरंग

२०२६

Photography



Hokitika Gorge, NZ





Wonders of Nature